महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

# खनिज मिश्रणाची आवश्यकता





जमिनीत, खाद्यात, चाऱ्यात खनिजांची कमतरता असणे तसेच अधिक दूध उत्पादनाचा ताण यामुळे जनावरांत विशेषतः दुधाळ जनावरामध्ये खनिजांची कमतरता भासते. खनिजांच्या कमतरतेमुळे जनावरांच्या आरोग्य, प्रजनन आणि उत्पादन क्षमतेवर विपरीत परिणाम होतो. म्हणून शरीराची आवश्यक खनिजांची पूर्तता होण्यासाठी जनावरांना नियमितपणे खनिज मिश्रण देणे गरजेचे असते.

## खनिज (क्षार) मिश्रणाचा पुरवठा कसा करावा ?

- आहारातून खनिज मिश्रण द्यावे.
- वासरांच्या गोठ्यात चाटण विटा टांगून ठेवाव्यात.
- पाण्यातून वा खुराकातून मीठ द्यावे.

## खनिज मिश्रण किती प्रमाणात द्यावे ?

- मोठ्या जनावरांना दररोज ३०-५० ग्रॅम
- लहान वासरांना दररोज १५-२० ग्रॅम

## खनिज मिश्रणाचे काय फायदे होतात ?

- दूध उत्पादनात वाढ होते.
- गर्भधारणेचे प्रमाण वाढते.
- बैलाची काम करण्याची क्षमता वाढते.
- वाढ झपाट्याने होते.
- आरोग्य उत्तम राहते.
- भूक वाढते व प्रकृतीमान सुधारते.
- अखाद्य वस्तू खाणे/चाटणे/चघळणे यासारख्या वाईट सवयी बंद होतात.




हे लक्षात घ्या..

**खनिज मिश्रण हे औषध नसून जनावरांच्या खाद्यातील आवश्यक घटक आहे.**

**द्या नियमित खनिज मिश्रण।**
**वाढेल हमखास दूध उत्पादन।।**

पशुविज्ञान व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग, प.वै.म., उदगीर